# वसतिगृह प्रवेश : नियम व अटी

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, यांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्यात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे चालविल्या जाणाऱ्या माजी सैनिकांच्या मुलां/मुलींच्या वसतिगृहात प्रवेशाबाबतीची माहीती थोडक्यात खाली नमूद केली आहे :-

१. शैक्षणिक वर्ष - शैक्षणिक वर्ष म्हणजे प्रवेशापासून ते परिक्षेच्या शेवटच्या दिवसापर्यंत.

२. वसतिगृह व्यवस्थापन कमेटी - ही कमेटी मा.जिल्हाधिकारी व अध्यक्ष यांच्या मंजूरीने स्थापन करण्यात येते. या कमेटीचे मुख्य काम मुलांच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करणे व वसतिगृह व्यवस्थित चालविणे. या कमेटीमध्ये जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व इतर तीन सदस्य असतील.(सेवानिवृत्त अधिकारी, जेसीओ व जवान)

३. वसतिगृह प्रवेश प्रक्रिया - शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला वर्तमानपत्रातून व रेडिओद्वार प्रसिध्दि देवून विद्यार्थ्याकडून अर्ज मागविण्यात येतात. अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्याचे अर्ज यादीसह वसतिगृह व्यवस्थापन समितीपुढे सादर केले जातात. वसतिगृह व्यवस्थापन समितीने वसतिगृहामध्ये प्रवेशाकरीता मंजूर केलेल्या विद्यार्थ्यांची यादी वसतिगृहाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाते व सदर यादी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे माहितीस्तव सादर केली जाते. नापास झालेल्या मुलांना प्रवेश दिला जात नाही. वसतिगृह प्रवेश हा हक्क समजला जावू नये. मुलांचे वर्तन समाधानकारक नसेल तर त्याला वसतिगृहातून काढून टाकण्याचे अधिकार सैनिक कल्याण अधिकारी यांना असतील.

४. (प्राधान्यक्रम) **PRIORITY**

(अ) युध्द विधवा आणि माजी सैनिकांच्या विधवा यांची सर्व पाल्य.

(ब) पदव्युत्तर (व्यावसायीक), वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यावसायिक पदवी पदव्युत्तर (इतर) अभ्यासक्रमामधील शिक्षण घेणारी पाल्य.

(क) बी. एड्., डी. एड्.

(ड) पदवी अभ्यासक्रम (गुणवत्ता यादीप्रमाणे )

(इ) १२ वी, ११वी,१० वी, ....... या क्रमाने.(गुणवत्ता यादी प्रमाणे)

[(ब) ते (इ) : माजी सैनिक अर्जाप्रमाणे पहिले पाल्य]

(ई) माजी सैनिकांचे दुसरे व तीसरे पाल्य

(उ) सेवारत सैनिकांचे पाल्य

(ऊ) जागा उपलब्ध असलेस सिव्हीलियन पाल्य (मा.संचालकांच्या परवानगीने)

५. मागील वर्षी पास झालेली मुले/मुली प्रवेशासाठी पात्र राहतील.

६. वैद्यकीय, अभियांत्रिकी, बीएड्, डीएड् इ. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरु झाल्यास एक किंवा दोन महिन्याच्या कालावधीसाठी अर्जाच्या अनुषंगाने काही जागा राखीव ठेवण्यात येतील.

७. ज्या ठिकाणी वसतीगृहाच्या क्षमतेपेक्षा कमी अर्ज आलेले असतील त्या त्या ठिकाणी उपरोक्त नियमांच्या अधिन राहून सर्वांना प्रवेश देण्यात येईल. भोजन खर्चाच्या वसुलीची रक्कम माजी सैनिकाच्या हुद्या प्रमाणे आकारण्यात येईल.

८. युध्दविधवा व इतर माजी सैनिकांचे विधवांचे सर्व पाल्यांना तसेच अनाथ पाल्यांना विनामूल्य प्रवेश देण्यात येईल.

९. जागा शिल्लक असल्यास माजी सैनिकांचे दुसरे व तिसरे पाल्यास माजी सैनिकांच्या (हुद्यानुसार) सवलतीचा दर आकारणेत येईल.

१०. लहान कोर्सेससाठी वसतिगृहात जागा उपलब्ध असल्यास वसतिगृहात प्रवेश देणेत येईल.

११. **अनाथ मुलांना प्रवेश** - सेवारत-सैनिक अथवा माजी सैनिक व त्याची पत्नी हे दोघे मयत झाले असतील तर त्यांच्या २५ वर्षाच्या खालील पाल्यांना वसतिगृहात मोफत प्रवेश दिला जाईल.

१२. ज्या माजी सैनिकाकडे ओळखपत्र आहे अशा माजी सैनिकांच्या आणि कार्यरत सैनिकांच्या पाल्यांना प्रवेश दिला जाईल.

१३. अवलंबीत म्हणजे पत्नी, २५ वर्षाच्या आतील न कमावणारी मुले व अविवाहीत मुली. ही मुले शासनमान्य शाळा/कॉलेजमध्ये शिकत असतील तर त्यांच्या पाल्यांना प्रवेश दिला जाईल. परंतु १५ ऑगस्ट १९६८ नंतर जन्मलेले माजी सैनिकांचे चौथे अपत्य प्रवेशास पात्र असणार नाही.

१४ विद्यार्थी म्हणजे माजी सैनिकांची लग्न न झालेली पाल्य, नोकरीवर असणाऱ्या जवानाची पत्नी, माजी सैनिक व विधवा जे शिक्षण घेवू इच्छित असतील ते विद्यार्थी म्हटले जातील.

१५. **प्रतिक्षा यादी** - माजी सैनिकांच्या मुलां/मुलींना वसतिगृहात प्रवेश मिळणेबाबतची प्रतिक्षा यादीची एक प्रत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात ठेवण्यात येते.

१६. वसतिगृहात राहून शिक्षण घेत असताना पाल्यास कोणत्याही प्रकारची नोकरी करण्याची परवानगी नाही.

१७. **भोजन खर्च व सुरक्षा अनामत आकारणी** - भोजन खर्च व सुरक्षा अनामत बाबतचे दर हे मा. संचालकांनी जिल्हानिहाय मंजूर केलेल्या दरसूचीप्रमाणे असतील. सदर भोजनखर्च व अनामत रक्कम ही फक्त **राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारेच** स्विकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट हा संबंधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचे नांवे असावा. भोजन खर्चाची रक्कम ही वर्षातील दोन सत्रात म्हणजेच दोन टप्यात स्विकारण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी एक किंवा दोन महिन्याचे आत वसतिगृह प्रवेश रद्द केल्यास त्यांनी भरलेली अनामत रक्कम, भोजन खर्च शुल्क व इतर कोणतीही भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

१८. **शिस्त व गैरवर्तणूक** - वसतिगृहातील मुलां/मुलींच्यात खाली नमूद केल्यापैकी गैरवर्तणूक आढळून आल्यास त्यांना वसतिगृहातून काढून टाकण्याचे अधिकार सैनिक कल्याण अधिकारी यांना आहेत.

अ) पाल्य कोणतेही व्यसन करणारा असल्यास

ब) पाल्याजवळ कोणतेही शस्त्र आढळल्यास

क) भोजन खर्चाची किंवा अन्य रक्कम वेळेवर न भरल्यास

ड) वसतिगृहाच्या मालमत्तेचे नुकसान करणे अथवा हरविणे..

इ) आपसांत चोरी करणे

ई) शाळा/कॉलेज/वसतिगृहात शिकत रहात असताना अन्य कोणतेही गैरवर्तणूक केल्यास.

या सर्व बाबी शिस्त मध्ये येतात. वर नमूद बाबीपैकी किंवा त्या व्यतिरीक्त काही गैरवर्तन नजरेत आल्यास त्यांच्यावर वसतिगृहातून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१९. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून भोजन व वसतीगृह प्रवेशाचे फी चे दर दिनांक ०१ जुन २०२३ पासुन खालीलप्रमाणे लागु केलेले आहेत :-

| जिल्हे | | सेवारत सैनिक | | | माजी सैनिक | | | सिव्हिलियन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अधिकारी | जे.सी.ओ | शिपाई/ एनसीओ | अधिकारी व ऑननरी कमिशन्ड अधिकारी | जे.सी.ओ | शिपाई/ एनसीओ | |
| (मंबई(MMR), पुणे व नागपूर) | निवास | 2000 | 1000 | 800 | 1000 | 800 | 500 | 2000 |
| | भोजन | 2500 | 2500 | 2500 | 2500 | 2500 | 2500 | 2500 |
| इतर जिल्हयांसाठी | निवास | 1500 | 1000 | 800 | 1000 | 800 | 500 | 1500 |
| | भोजन | 2000 | 2000 | 2000 | 2000 | 2000 | 2000 | 2000 |